
N'73159
3-11-22

जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर
वर्ष : ६५ अंक दुसरा

# पंचधारा

## शंकर रामाणी विशेषांक



U-34
3-11-22

RNI Reg. No. 32307/79 मूल्य : ९५/- मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य हैद्राबाद



पत्नी लीला शंकर रामाणीं सह






महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## शंकर रामाणी विशेषांक

**वर्ष ६५ वे, अंक दुसरा**
**जुलै ते सप्टेंबर २०२२**
**आषाढ श्रावण भाद्रपद १९४४**

**संपादक मंडळ**

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
डॉ. शोभा देशमुख
डॉ. गीता काटे
प्रा. मीना जागीरदार
श्रीमती विद्या मक्तल
श्री. माधव रामराजे चौसाळकर

**अतिथी संपादक**
डॉ. अनुजा जोशी

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. 32307/79

**कार्यवाह**
म. सा. प. तेलंगण राज्य
४-६-४५८, इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७.
**दूरध्वनी** : (०४०) २४६५५७०६३, **भ्रमणध्वनी** : ७८४२८५३९८४

**प्रकाशक**
डॉ. विद्या देवधर

**सर्व हक्क** – म. सा. प. तेलंगण राज्य

या अंकात प्रकट झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
फक्त एक व तीन वर्षाची वर्गणी स्वीकारली जाईल.
पंचधारेच्या आर्थिक व्यवहाराचे वर्ष एप्रिल ते मार्च असे आहे.
सर्व सभासदांनी आपले E-mail ID फोन नंबर
पुढील क्रमांकावर पाठवावेत. ७८४२८५३९८४

पंचधारा वर्गणी Marathi Sahity Parishad
IDBI Bank, Kachiguda Branch
A/C. No. 59410010000125 किंवा Panchdhara
A/C. No. 59410010001359, IFSC Code – IBKL0000594
*(For both accounts)*
या खात्यावर जमा करावी. मनीऑर्डर पाठवू नये.

वार्षिक वर्गणी रु. २००/-
तीन वर्षाची वर्गणी रु. ५००/-
आजीव सदस्य वर्गणी रु. २,०००/-
(वर्गणी शक्यतो डी. डी. ने पाठवावी)
बाहेरगावचा चेक असल्यास वटणावळीचे रु. ३५/- अधिक पाठवावेत, ही विनंती

या अंकाचे मूल्य : रु. ९५/-

टपाल खर्च : रु. ३५/-

मुखपृष्ठ : महेश वेंगुर्लेकर, गोवा. फोन : ९८२२४००८८८

ॲक्रॅलिक चित्रे : दिलेश हजारे, गोवा. फोन : ८८०६४५२३७५

अक्षरजुळणी : अमोघ आर्ट्स,पुणे. फोन : ९३२६०८६२८५

मुद्रक : श्रीगणेश मुद्रणालय, ३५७, शनिवार पेठ, पुणे ३०.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखांशी, विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


संपादकीय ........................................................ ५

१. **समकालीन वेधाचा सुंदर प्रवास**
डॉ. अनुजा जोशी ........................................................ ७

२. **जाणीव-नेणिवेच्या आभाळवाटांचा आर्तोत्सव (शंकर रामाणी-काव्यशैली)**
आश्लेषा महाजन ........................................................ १४

३. **शंकर रामाणी यांची कविता**
मंगेश नारायणराव काळे ........................................................ २३

४. **शंकर रामाणी यांच्या कवितेतील ऋतुसंवेदन आणि गूढगुंजन**
सुनील शिनखेडे ........................................................ २९

५. **शंकर रामाणींच्या कवितेतील 'प्रेमभावना' - एक सर्जक चकवा**
अरुण म्हात्रे ........................................................ ३८

६. **शंकर रामाणी यांची निसर्गकविता**
प्रा. विनायक लक्ष्मण बापट ........................................................ ५१

७. **'कवी तळ ढवळतो तेव्हा....'**
श्रीकांत देशमुख ........................................................ ६१

८. **रामाणी यांच्या चिमण्यांचे पुनश्च सहर्ष स्वागत**
अविनाश साळापुरीकर ........................................................ ६६

पुस्तक परिचय :

१. **बालमनाला मोहवणारी काव्यरूप 'सूर्यफुले'**
स्नेहा अमोल मोरजकर ........ ७१

२. **शंकर रामाणींचे भावविश्व व्यक्त करणारी 'कातरवेळ'**
पूर्वा पंडित वस्त ........ ७५

३. **'आभाळवाटा' या काव्यसंग्रहाचा विवेचनात्मक परामर्श**
डॉ. विनय मडगांवकर ........ ८६

४. **विविधांगी रूपांनी नटलेला 'पालाण'**
स्नेहा संभाजी जांबोटकर ........ ९७

५. **गूढगर्भी कवितेचा आविष्कार 'दर्पणीचे दीप'**
प्रा. चिन्मय मधू घैसास ........ १०४

६. **मनाच्या गाभ्यातून - 'गर्भागार'**
राधिका रा. नागवेकर ........ १०९

ग्रंथ परीक्षण :

१. **साधार, सप्रमाण, संदर्भमूल्ययुक्त दस्तऐवज**
डॉ. सोमनाथ कोमरपंत ........ ११६

२. **पत्रांच्या सोबतीने गायलेले 'एकट्याचे गाणे'**
डॉ. वंदना बोकील-कुलकर्णी ........ ११९

३. **"रामाणी": शंकर रामाणी नावाच्या गूढाचा वेध**
प्रा. अरुणा गानू ........ १२४

**लेखक परिचय** ........ १२८

**स्वागत नव्या पुस्तकांचे** ........ १३२

# शंकर रामाणी यांची निसर्गकविता



प्रा. विनायक लक्ष्मण बापट

निसर्ग कवितेची एक समृद्ध परंपरा मराठी काव्य विश्वाला आहे. अगदी संत काव्याचा विचार केला तर त्यात देखील, निसर्ग विषयक जाणिवा व्यक्त झालेल्या दिसतात. आधुनिक काव्याच्या निर्मितीनंतर मराठीतील निसर्गविषयक जाणिवा अधिक समृद्धपणे काव्यातून व्यक्त होवू लागल्या. आधुनिक मराठी काव्याचे जे अनेक विशेष सांगितले जातात त्यामधील 'समृद्ध निसर्ग जाणीव' हा एक महत्त्वाचा विशेष म्हणून सांगितला जातो. केशवसुतांच्या कवितेतील 'निसर्ग जाणीव' हा अगदी महत्त्वाचा घटक नसला तरी नोंद घेण्याइतपत निसर्ग जाणिवा त्यांच्या कवितेतून व्यक्त झाल्या आहेत. खऱ्या अर्थाने मराठी काव्य विश्वात निसर्ग कवितेला स्वतंत्र असे स्थान प्राप्त करून दिले ते बालकवींनी! फक्त वर्णनासाठी नव्हे तर निसर्ग हा बालकवींच्या अनुभवाचा विषय होवून काव्यातून व्यक्त होताना दिसतो. आत्यंतिक तरल संवेदना व्यक्त करणारी आणि विशुद्ध स्वरूपाची निसर्गकविता सर्वप्रथम मराठी काव्यविश्वात त्यांनीच लिहिली आणि त्यानंतर निसर्ग कवितेला मराठी काव्यविश्वात मानाचे स्थान प्राप्त झाले. नंतरच्या काळात बा. भ. बोरकर, मंगेश पाडगावकर, ना. धो. महानोर, इंद्रजित भालेराव अशा अनेक कवींनी ती परंपरा समृद्धपणे पुढे चालवल्याचे दिसते. या मांदियाळीतील आणि बोरकर समकालीन म्हणता येतील असे एक महत्त्वाचे कवी म्हणजे शंकर रामाणी. बोरकरांप्रमाणेच रामाणी हे देखील गोमंतकीय कवी. यासंदर्भात डॉ. अनुजा जोशी यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेतले पाहिजे. त्या म्हणतात, "गोव्यामध्ये मराठी कवितेचा वारसा बा. भ. बोरकरांनंतर शंकर रामाणीनी समर्थपणे पुढे चालवला. बोरकरांची कविता निखळ आनंदमार्गी व रामाणींची कविता गूढ व्यथामार्गी असा मुळातील फरक असला तरी दोन्हींची अंतःप्रेरणा व आशयसूत्रे सकारात्मक जीवननिष्ठेचीच आहेत."[१] या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे बोरकरांची ओळख निसर्गकवी अशीच आहे आणि त्यांचा वारसा रामाणी समर्थपणे चालवतात असे डॉ. जोशी म्हणतात तेव्हा यांना रामाणींच्या कवितेतील निसर्गजाणिवांचे भान निश्चितच

असले पाहिजे. शंकर रामाणी यांच्या एकूण कवितेचा अभ्यास करता निसर्ग प्रतिमांचा विपूल वापर कवी आपल्या काव्यलेखनात करतोच पण त्याच बरोबर निसर्ग हा कवीच्या अनुभवाचा विषय झाल्याचेही जाणवते.

शंकर रामाणी यांच्या निसर्ग कवितांचा अभ्यास करताना जे काही विशेष जाणवले ते अगोदरच नमूद केले पाहिजेत.

१) शंकर रामाणींची प्रारंभीची कविता ही अधिक निसर्गजाणिवेनी संपृक्त अशी आहे.

२) मनोविश्लेषण करण्यासाठी रामाणी निसर्ग प्रतिमांचा आधार घेतात म्हणूनच काळोख, अंधार या प्रतिमा असंख्य वेळा येतात किंवा तो कवीचा स्थायीभाव म्हणून व्यक्त होताना दिसतो.

३) प्रारंभीच्या त्यांच्या कवितेवर बोरकरांच्या काव्याचा निश्चितच प्रभाव आहे. प्रीतिभाव व्यक्त करण्यासाठी ज्या निसर्गप्रतिमा येतात त्यातून हे स्पष्टपणे जाणवते.

४) मानवी भावना आणि निसर्गप्रतिमा यांचे नेमके संयोजन करण्याचा तोल शंकर रामाणी यांची कविता साधताना दिसते.

५) वैयक्तिक भावनांचे प्रगटीकरणही रामाणी निसर्गप्रतिमा वापरूनच करतात.

६) अपवादात्मक म्हणाव्यात अशा काही कवितांमधून त्यांनी निखळ निसर्गजाणीवा व्यक्त केल्या आहेत.

७) निसर्ग चक्रातील ऋतुंसंवेदनांची जाणीव काव्यातून देणे हा रामाणींच्या कवितेचा विशेष आहे पण हे ऋतु सर्वांगाने आकळणे नाही तर ऋतुंच्या विशेषांतून मानसिक अवस्था चित्रित करणे आहे, त्यामुळे या ऋतु जाणिवांतून'वैशाख वणवाच' अधिकतर पेटलेला दिसतो.

८) रामाणींच्या अनेक कवितांमधून संमृद्ध आध्यात्मिक जाणिवा व्यक्त झाल्या आहेत आणि या जाणिवा अनेकवेळा निसर्गप्रतिमांतून व्यक्त झाल्या आहेत. गूढ भावना व्यक्त करण्यासाठी देखील निसर्ग प्रतिमा उपयोजिल्या आहेत.

९) रामाणींच्या कल्पनाशक्तीची अद्भुतता त्यांनी योजलेल्या निसर्गप्रतिमांतूनच व्यक्त होते.

१०) उत्तर काळात त्यांच्या काव्यातून निखळ निसर्गभाव हा नाहिसा झाला असून फक्त मनातील अर्थाचे संयोजन करण्यासाठी म्हणून निसर्ग प्रतिमा येतात त्यांचा प्रत्यक्ष निसर्ग जाणिवांशी काहीच संबंध असल्याचे दिसत नाही.

या मुद्द्यांच्या अनुषंगानेच रामाणींच्या निसर्गकवितांचा आढावा घेणे शक्य आहे. कविवर्य शंकर रामाणी यांची प्रारंभीची निसर्ग कविता ही रोमॅन्टिक जाणीवेतून

व्यक्त होताना दिसते व ती समकालीन मराठी काव्यजाणिवांना समांतर अशीच आहे. या संदर्भात डॉ. के. के. अहिरे यांनी व्यक्त केलेले मत देखील लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणतात, निसर्गाचा अलंकारासाठी जसा कवी उपयोग करून घेतो त्याचप्रमाणे निसर्गातील सौंदर्यगर्भ चित्रण स्वतंत्रपणे सौंदर्यवादी भूमिकेतून कवी करीत असतो. कवी शंकर रामाणी यांनी निसर्ग कवितांतून अतिशय प्रत्ययकारी सौंदर्यचित्रण केले आहे."(२) त्यांचे हे मत त्यांच्या प्रारंभीच्या निसर्ग कवितांच्या संदर्भातच लागू पडणारे आहे. नंतरची त्यांची निसर्ग कविता ही सौंदर्य जाणिवांशी फारकत घेणारी आहे. प्रारंभीच्या कवितेत मात्र सौंदर्यवेधक दृष्टितून विलोभनीय अशी निसर्गचित्रे रामाणी यांनी रेखाटली आहेत. उदाहरणार्थ,

*कातरवेळेला*
*पश्चिम क्षितिजीं*
*अंधार-तेजाचे*
*अंतिम मीलन*

(कातरवेळ)

निसर्ग प्रतिमांचे नेमके संयोजन यात दिसते त्याच बरोबर मनातील खिन्नता भीती, नैराश्य यांचे दर्शनही

*कातरवेळेला*
*भोंवती भयाण*
*सांचू लागतो*
*घन अंधार;*

(कातरवेळ)

या पुढील कडव्यातून होते. एकूण खिन्नता, उदासी हे रामाणींच्या काव्याचे स्थायीभाव आहेत याचे सूचनच या प्रारंभीच्या त्यांनी उपयोजिलेल्या निसर्गप्रतिमांतूनही आपणाला प्रतीत होते. मनातील आर्त भावना देखील रामाणी निसर्ग प्रतिमांतूनच व्यक्त करतात किंबहुना हे करण्यासाठीच ते आपल्या काव्यात निसर्गप्रतिमा वापरतात असे म्हणता येते.

*मेघ पसरले; आलें - काळवंडून आकाश*
*चपलेच्या नर्तनांत पाहतो प्रकाश*
*माझा संपेना प्रवास*

*(मोर)*

याच मनोभावना जेव्हा अधिक तीव्र होतात तेव्हा त्या व्यक्त करण्यासाठी

प्रतिमांचे रूपही बदलते / चंद्र सुद्धा ठेच लागलेलाच जाणवतो. उदाहरणार्थ,

*मध्यरात्रीच्या*
*निवांत वेळी*
*पूर्व दिशेच्या*
*उंबऱ्यावर*
*ठेच लागून*
*कृष्णपक्षांतील*
*उदास चंद्राचा*
*फुटला आरसा;*
*संपेना प्रवास*

(मध्यरात्रिच्या निवांत वेळी)

सामान्यतः चंद्राची जी प्रतिमा काव्यातून येते त्याला विरोधाभासी अशी ही प्रतिमा आहे. ही निसर्गजाणीव मनातील भावनांना शब्दरूप देण्यासाठीच म्हणून आली आहे आणि त्यातील निसर्ग जाणीव ही झाकलेली आहे. या संदर्भात अशी आणखीनही उदाहरणे देता येतील. कवीची जी मनोवृत्ती असते त्याला अनुकूल अशा प्रतिमांचा शोध कवी घेत असतो. मनातील आशयाला नेमकी अर्थपूर्णता देण्यासाठी कवी अशा प्रतिमांचा शोध निसर्गातून घेतो कारण तो त्याच्या अनुभवाचा विषय असतो. यासंदर्भात एक गोष्ट पाहण्यासारखी आहे. बा. भ. बोरकर आणि शंकर रामाणी हे एकाच वातावरणांत, एकाच सांस्कृतिक पर्यावरणांत आणि जवळ जवळ एकाच काळातील कवी पण त्यांच्या प्रकृती धर्मानुसार त्यांनी निसर्गप्रतिमांचे आपल्या काव्यातून केलेले संयोजन अत्यंत वेगळ्या धाटणीचे आहे. उदाहरणच घ्यायचे झाल्यास रामाणींच्या कवितेतून अंधार, काळोख, वैराण वैशाख, अशा प्रतिमा पुन्हा पुन्हा येतात आणि या प्रतिमा खिन्नता, निराशा, उदासिनता व्यक्त करण्यासाठीच येतात. बोरकरांनी तमःस्तोत्र लिहिले तेही आशावादाने भारलेले आहे प्रकाशाचा जन्मदाता म्हणून ते अंधाराकडे पाहतात. रामाणीही तमाच्या तळाशी दिवे लावीत असले तरी हा प्रकाश अंधुकच राहतो. एकूण दोघांचा आपापल्या मनोभूमिकेतून निसर्गाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनातून एक आनंदयात्री तर दुसरा व्यथामार्गी झाल्याचे दिसते. यामुळेच बोरकरांच्या काव्यातील निसर्ग हा जिवंत आणि रसरसता तजेला घेऊन येतो तर रामाणींचा निसर्ग वेदनेचा दाह घेऊन येतो. असे असले तरी काही मोजक्याच कवितांमधून रामाणी निखळ निसर्ग संवेदनाही व्यक्त करताना दिसतात. उदाहरणार्थ,

*डोळे भरून पहावें*
*धुंद हिरवे वैभव*
*खुल्या पाटाच्या पाण्याशीं*
*पिटकुळीचे लाघव*

(स्वैर भटकावे)

किंवा

*स्वच्छ एकटे तळें*
*सुखावले चांदण्यात*

(तळें)

पण अशा कविता क्वचितच आहेत आणि त्याही प्रारंभीच्या संग्रहातच आहेत. प्रीतिभावना निसर्गप्रतिमांच्या माध्यमातून व्यक्त करणे हे बोरकरांचे वैशिष्ट्य! बोरकरांच्या प्रभावातूनच रामाणींच्या प्रारंभिच्या संग्रहात अशा धाटणीच्या कविता सापडतात. उदाहरणार्थ,

*क्षणभर तू दिसलीस मनोहर सांज तारकेपरी*
*आणि नवी गेलीस लावूनी हुरहुर माझ्या उरीं*

पण हा आपला मनोधर्म नाही हे त्यांच्या लवकरच लक्षात आले असावे व अशा उपऱ्या जाणिवा व्यक्त करण्यापासून ते दूर गेले असावेत. निसर्गातील विविध घटकांचे नेमके संयोजन करून त्यातून निसर्गाची स्थितीगती व्यक्त करतानाच मानवी भावभावनांचे दर्शन त्यातून घडविण्याचे शंकर रामाणी यांचे कसब त्यांच्या काही कवितांमधून नेमकेपणाने दिसून येते. उदाहरणार्थ,

*मिटे रात्रीची पापणी*
*फुटे पूर्वेस पहाट*
*प्रकाशाच्या आगमनानें*
*लाल क्षितिजाचा काठ*

(मिटे रात्रीची पापणी)

किंवा

*किती भाजला उन्हाळा :*
*उष्ण अर्थाचे उमाळे;*
*विश्व निराळे पोसून*
*आत आषाढ कोसळे*

(आषाढ)

या त्यांच्या कवितांतून व्यक्त होणारा निसर्ग हा त्यांच्या मनोधर्माशी एकरूप झालेला निसर्ग आहे आणि म्हणूनच या प्रतिमा आत्यंतिक अर्थवाही झाल्या आहेत. मानवी भावभावनांचे म्हणत असतानाच वैयक्तिक भावनांचे वा मनातील घालमेलीचे दर्शन शंकर रामाणी अनेक वेळा निसर्गाच्या माध्यमातूनच करताना दिसतात उदाहरणार्थ,

*थकलेलें जीवन अन्*
*सलणारे दुःख उरीं*
*चुकलेल्या वाटेवर*
*टळलेली सांज परी*

(खिन्न खिळते नजर)

किंवा

*विझलेले रात्रीचे*
*अजुन मंद मौनदिवे;*
*झाडांच्या मुग्ध तळीं*
*छायांचे जळ फसवें*

(शाप)

अशी इतरही काही उदाहरणे देता येतील. आपल्या मनोधर्माला वा प्रकृतीधर्माला साजेशा आणि मनातील आशय नेमकेपणाने व्यक्त करण्यासाठी एवढ्या चोखंदळपणे निसर्गप्रतिमा निवडणे हे रामाणीचे मोठे कौशल्यच म्हटले पाहिजे. ही कारागिरी नाही तर निसर्गाशी तादात्म्य पावल्यानेच या प्रतिमा आकार घेतात आणि त्यामुळेच त्या आशयाशी अगदी एकरूप झाल्याच्या दिसतात. रामाणींच्या कवितेतील 'ऋतुसंवेदन' हा त्यांच्या निसर्गकवितांचा आढावा घेताना मुद्दामहून लक्षात घ्यावा असा मुद्दा आहे. या ऋतुसंवेदांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे अगदी प्रारंभीच्या काव्यापासून शेवटापर्यंत हे ऋतुसंवेदन' त्यांच्या काव्यातून प्रतीत होतच राहते. या संदर्भात डॉ. अनुजा जोशी यांनी व्यक्त केलेले मत लक्षात घेण्यासारखे आहे. त्या म्हणतात, "निसर्ग व त्यांचा ऋतुमेळा स्पंदनशील कवी वृत्तीवर आपले पडसाद उमटवतोच. बोरकर, आरती प्रभू, रामाणींनी त्यांच्यात मुरलेल्या निसर्ग जाणिवांचा समृद्ध आविष्कार केला. 'शब्दांना फुटली ऋतुपालवी' असे रामाणींच्या कवितेचे वर्णन करता येईल. इतक्या उत्कटपणे ऋतू-अनुभूती त्यांच्या कवितेत येतात. 'एका चैत्रचुंबी फांदीला लटकलेले अलवार झुलणारे

एक घरटे' अशा अनोख्या प्रतिमा 'ऋतुसंवेदना' कवितेत रूप घेतात."(३) एकूण भारतीय पंचांगातील बारा महिने किंवा सहा ऋतु यांची सृष्टितून आकळणारी संवेदनात्मक जाणीव अनेक कवितांमधून रामाणींनी व्यक्त केली आहे.

*धरतीच्या अंगावर*
*शुभ्र धुक्याची चादर;*
*थंडगार मार्गशीर्ष*
*करी थंडीचा कहर*

(मिटे रात्रीची पापणी)

किंवा

*उग्र दिशांच्या दिठींत*
*सांद्र, श्यामल भावना*
*ऐन ग्रिष्मांत फळली*
*दग्ध धरेची वेदना!*

(ऐन ग्रिश्मात फळली)

किंवा

*चतुर चैत्रगंध उठे*
*शिशिरधुंद मातीतुन*

(मी फुलतां माझ्यातून)

अशी इतरही असंख्य उदाहरणे देता येतील. त्यांनी आपल्या काव्यातून उभारलेले ऋतुसंवेदन निश्चितच अभ्यासनीय आहे. गोमंतकीय मातीचा, परिसराचा गंध देखील या ऋतुसंवेदनाला लाभला आहे. अर्थात या निखळ ऋतुसंवेदना निश्चितच नाहीत. मनाच्या आर्त, उदास किंवा उन्मनी अवस्थेत कवीला जाणवलेले हे ऋतुसंवेदन आहे आणि त्यामुळेच या एकूण ऋतुसंवेदनांवर ग्रीष्म ऋतुची आणि वैशाख महिन्याची दाट छाया पडल्याचे दिसते. कवीची मनोवस्था समजून घेण्यासाठी त्यांनी आपल्या काव्यातून उभारलेले ऋतुसंवेदन अभ्यासता येण्यासारखे आहे.

शंकर रामाणींची कविता म्हटली की आध्यात्मिकता आणि गुढता हे मुद्दे उपस्थित होतातच आणि त्यांना स्पर्श ना करता पुढे जाणेही शक्य नाही. अर्थात या ठिकाणी फक्त या भावना निसर्ग संवेदनांच्या माध्यमांतून त्यांच्या कवितांमधून कशाप्रकारे व्यक्त होतात एवढ्या मर्यादित अर्थानेच या मुद्द्यांकडे पाहिले आहे. मनातील आध्यात्मिक जाणिवेला निसर्ग प्रतिमांच्या माध्यमांतून रामाणी अधिक संवेद्य किंवा आशयगर्भ करतात असे दिसते. उदाहरणार्थ,

*काळरात्र झाली मीरा*
*पितां काळोखाचे विष*
*नक्षत्रांच्या आंसवांनीं*
*चिंब भिजले आकाश*

(काळरात्र झाली मीरा)

*गर्भात झुळ् झुळे*
*निरभ्रसा छंद;*
*पुनवे आधीच*
*चांदण्याला गंध*

(तंद्रीतलें विश्व)

रामाणींची कविता ही आत्यंतिक सखोल अशा आध्यात्मिक जाणिवा व्यक्त करणारी आहे असें अनेक अभ्यासकांनी म्हटले आहे. यासंदर्भात याठिकाणी चर्चा करणे शक्य नसले तरी वरील दोन उदाहरणे पाहाता कवीची विशिष्ट मनोवृत्ती अधिक प्रखरपणे त्यांच्या काव्यातून व्यक्त होताना दिसते. त्या संदर्भात असंख्य छटा घेऊन त्यांच्या कवितांमधून येणारी अंधार, काळोख, तम या प्रतिमा अभ्यासता येण्यासारख्या आहेत. तंद्रीतले विश्व मधील निसर्गप्रतिमांमधून मात्र आध्यात्मिक जाणिवां जास्त सखोलतेने व्यक्त झाल्या आहेत.

'रामाणींची कविता ही गूढतेच्या धुक्यात गुरफटलेली अहे आणि त्यामुळेच ती दुर्लक्षित राहिली' असे आक्षेप काही अभ्यासकांनी त्यांच्या कवितेवर घेतले आहेत. ही गूढतता काही निसर्गप्रतिमांच्या माध्यमातून देखील दिसून येते. उदाहरणार्थ,

*तुझ्या-माझ्यामधें आहे*
*गूढ कार्तिकाचे पूल.*
*रंग रंग पहाटेचे*
*तेथें घेतात चाहूल*

(धुके)

किंवा

*सांजबनांतून उठे*
*काळोखाची हाक;*
*पावलांच्या वाटेवर*
*सावल्यांचा धाक*

(गूढ)

कार्तिकाचे पूल किंवा सावल्यांचा धाक या प्रतिमांमधून एक गूढता कवी निश्चितपणे व्यक्त करताना दिसतो. गूढता ही काही काव्यात कारागिरी म्हणून करण्याची गोष्ट नव्हे. रामाणींच्या कवितांचा अगदी सूक्ष्म अभ्यास केल्यास ती गूढ नाही या निष्कर्षापर्यंत एखादा अभ्यासक येणे शक्य आहे किंवा वाटणारे गूढ उकलून दाखवणे देखील त्याला शक्य आहे. या संदर्भात गूढार्थ घेऊन येणाऱ्या या निसर्गप्रतिमांचा अभ्यास करता येतो. माणसाचे आयुष्य, नियती आणि त्याचा सततचा चालणारा संघर्ष या घटना लक्षात घेतल्यास वरील निसर्ग प्रतिमांतील गूढही उकलणे सहज शक्य आहे. कल्पनात्मकतेचा अद्भूत आविष्कार म्हणून रामाणींनी केलेल्या काही निसर्ग वर्णनाकडे पाहाता येते. एकूण त्यांच्या निसर्ग कवितेत विशेष उठून दिसणारी अशी ही गोष्ट आहे. उदाहरणार्थ,

*सांज दाटली विटकररंगी;*
*वत्स उन्हाचें अंग चाटतें*
*श्रांत धरेचें, आणि पाहतें*
*जग विसरूं दिवसाचें नातें...*

(सांज दाटता)

किंवा

*तीन उन्हाचे दगड ठेविले*
*आणि रांधले जिणें;*
*माध्यान्हींचा सूर्य ढाळतो*
*माथ्यावर चांदणे.*

(तीन उन्हाचे दगड ठेविले)

किंवा

*केव्हापासून मी इथे उभा आहे तिष्ठत*
*निंबोणीच्या झाडांत अडकलेला*
*चंद्र कोसळण्याची वाट पाहत.*

(हिमशुभ्र घोड्यावर बसून)

किंवा

*दिवसभराच्या लाल धुळीने माखलेली,*
*चुरलेली पांढरी चादर सर्वांगावर लपेटून*
*ऐन शिशिरातली एक म्हातारी संध्याकाळ*
*मावळतीच्या मृत्युशय्येवर निपचित, निस्तेज*

(शिशिर)

अशी इतरही अनेक उदाहरणे घेता येण्यासारखी आहेत. वर उद्धृत केलेली उदाहरणं ही वेगवेगळ्या संग्रहातील आहेत. शंकर रामाणी यांच्या काव्यप्रतिभेचा एक महत्त्वाचा विशेष म्हणून या कवितांकडे पाहता येईल. अशाप्रकारच्या रचना त्यांच्या प्रारंभापासून शेवटपर्यंतच्या सर्व संग्रहात दिसून येतात. शंकर रामाणी हे निसर्गाकडे कोणत्या दृष्टिने पाहतात याचा शोध या कवितांच्या माध्यमातून घेता येतो. 'आपल्या काव्य सृष्टितील आपला सहचर' ही रामाणी यांची निसर्गाकडे बघण्याची वृत्ती आहे. अर्थात स्वतःच्या जीवनातील उदासिनता, खिन्नता यांचे पडसाद देखील ते अशा कवितांमधून शोधतात. या संदर्भात मनातील संवेदनानांना नेमका आशय देण्यासाठी त्यांनी मुद्दामहून घडविलेल्या परंतु आशयाशी एकरूप झालेल्या काही निसर्गप्रतिमा पाहाण्या सारख्या आहेत उदाः हसू श्रावणपिवळें, बावलेली उन्हे, झिंगलेला तम, माघमोकळे क्षितीज, काळी आग, दुपारलेले डोळे, कावळा काळोख, उन्हाचे आरसे इ. या त्यांनी घडविलेल्या प्रतिमा निश्चितच अभ्यासनीय आहेत. या संदर्भात शंकर रामाणी यांची कविता बालकवींच्या काव्यप्रतिभेशी नाते सांगते असेही म्हणता येते. बालकवीना जाणवणारी मानवी जीवनातील अपूर्णता निसर्गातील पूर्णत्वाच्या जाणीवेतून अधिक तीव्र होते तर शंकर रामाणी हे मनातील अपूर्णतेच्या भावनेला निसर्गाप्रतिमांच्या अद्भुत आविष्कारातून पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न करतात. या द्वंद्वात त्यांची कविता निश्चित निर्णयाप्रत येत नाही आणि म्हणूनच त्यांची कविता धुक्यात गुरफटल्यासारखी वाटते.

वरील आढाव्यातून शंकर रामाणी यांच्या निसर्गकाव्याचे एकंदरीतच स्वरूप सहज लक्षात येते. निसर्ग हा त्यांच्या जाणीवेचा तर भाग आहेच पण तो त्यांच्या नेणीवेचाही एक भाग बनून काव्यात येतो हे त्यांच्या समग्र कवितेचा अभ्यास करता लक्षात येते. मराठीतील निसर्गकवीतेची जी एक प्रचलीत परंपरा आहे त्यापासून भिन्न असा आयाम आपल्या कवितांतून शंकर रामाणी यांनी दिला आहे आणि हे मराठीतील निसर्ग कवितेला त्यांनी दिलेले मोठे योगदान आहे.

## संदर्भ सूची


१) जोशी, अनुजा, (संपा.) रामाणी : शंकर रामाणी यांची समग्र मराठी कविता, गोवा मराठी अकादमी, पणजी. २०२२ पृ. २१

२) अहिरे, के., के., 'कवितात्रती कवी शंकर रामाणी' अथर्व पब्लिकेशन, धुळे २०११ पृ. ४८, ४९

३) जोशी, अनुजा, (संपा.) रामाणी : शंकर रामाणी यांची समग्र मराठी कविता, गोवा मराठी अकादमी, पणजी. २०२२ पृ. ७५


■